# प्रेस नोट

.. ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २३.०६.२०२१ .

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शनं ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | अर्जुन गंगारामजी राठोड, लेखा परिक्षा लिपीक, सहायक संचालक, स्था.नि.लेखापरिक्षा कार्यालय, अमरावती, वर्ग – ३, वय 52 वर्षे |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक २३.०६.२०२१ चे १३.१५ वा. |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | भारतीय स्टेट बॅक, कॅम्प शाखा समोर, बियाणी चौक, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे सेवानिवृत्त असुन त्यांनी दिनांक २२.०६.२०२१ रोजी तक्रार नोंदविली की, त्यांचे सेवापुस्तकामध्ये त्रृटी असल्याने मागील एक वर्षापासुन त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नाही. सदर वेतन पडताळणी करुन देणेकरीता संचालक, लेखा परिक्षा कार्यालय येथील लिपीक श्री.अर्जुन राठोड हे ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत प्राप्त तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांची वेतन पडताळणी करुन देण्याचे सांगुन आलोसे श्री.अर्जुन राठोड यांनी ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम दिनांक २३.०६.२०२१ रोजी स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक २३.०६.२०२१ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांना आलोसे यांनी फोनव्दारे संपर्क करुन वर नमुद घटनास्थळी बोलवून सदर ठिकाणी पंचासमक्ष ३०,०००/– रुपये लाच स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन नमूद आरोपींविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपूरा, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.ना.सुनिल व–हाडे, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ, पो.ना.चंद्रकांत जनबंधू यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री क्रमांक : १०६४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१–२५५३०५५

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned with CamScanner